माहितीचा अधिकार

क्रमांक : ६ अ / माअ/१-१७ मुधे/ २०२५.
पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर.
दुरध्वनी क्र. : (०२३१) २६६२३३३.
ई-मेल :sp.kolhapuur@mahapolicegov.in.
दिनांक : ०२ / ०४ / २०२५.
०३

माहितीचा अधिकार,अधिनियम २००५ चे कलम ४(१)(A)(B) अन्वये पोलीस अधीक्षक कार्यालया कडील खालील प्रमाणे ०१ ते १७ मुद्यांची माहिती जनतेसाठी उपलब्ध करुन देणेत येत आहे.

१)खात्याच्या कामकाजाची व कर्तव्याची संपुर्ण माहिती

पोलीस अधीक्षक कोल्हापूर यांच्या कार्यक्षेत्रात एकुण पोलीस ठाणे व शाखा सद्या अस्तित्वात असणा-या त्या-त्या कार्यक्षेत्रा प्रमाणे खलीलप्रमाण विभागणी करणेत आली आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	जन माहिती अधिकारी	अपिलीय अधिकारी
०१	पोलीस अधीक्षक कार्यालय, कोल्हापूर		पोलीस उपअधीक्षक (मुख्यलय), कोल्हापूर.
	स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा.	प्रभारी अधिकारी/स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा,कोल्हापूर.	
	जिल्हा विशेष शाखा	प्रभारी अधिकारी/जिल्ह विशेष शाखा कोल्हापूर.	
	मोटार परिवहन विभाग	प्रभारी अधिकारी/मोटार परिवहन विभाग कोल्हापूर	
	पोलीस मुख्यालय,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/पोलीस मुख्यालय कोल्हापूर.	
	नियंत्रण कक्ष,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/नियंत्रण कक्ष कोल्हापूर	
	बिनतरी संदेश विभाग,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/बिनतारी संदेश विभाग कोल्हापूर	
	वाहतुक नियंत्रण शाखा,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/वाहतुक नियंत्रण शाखा कोल्हापूर	
	बॉम्ब शोधक व नाशक पथक,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/बॉम्ब शोधक व नाशक पथक,कोल्हापूर	
	पोलीस कल्याण उपक्रम,कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/पोलीस कल्याण उपक्रम कोल्हापूर	
	पोलीस को-ऑप सोसा.कोल्हापूर	प्रभारी अधिकारी/पोलीस को-ऑप सोसा कोल्हापूर	
	वाचक शाखा.	प्रभारी अधिकारी/वाचक शाखा कोल्हापूर	
	आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा.	प्रभारी अधिकारी/आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखा,कोल्हापूर	
	आस्थापना/लेखा/पत्रव्यवहार व अर्ज शाखा	कार्यालय अधीक्षक	
०२	अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज विभाग कॅम्प इचलकरंजी.	वाचक पोलीस उपनिरीक्षक	अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज विभाग, कॅम्प इचलकरंजी.
०३	उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग	अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.
०४	जुना राजवाडा पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,जुना राजवाडा पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी,शहर विभाग कोल्हापूर.
०५	लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे	
०६	राजारामपुरी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,राजारामपुरी पोलीस ठाणे	

०७	शाहुपुरी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,शाहुपुरी पोलीस ठाणे	
०८	उपविभागीय पोलीस अधिकारी,करवीर विभाग, कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग	अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.
०९	करवीर पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,करवीर पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी, करवीर विभाग कोल्हापूर.
१०	कागल पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,कागल पोलीस ठाणे	
११	मुरगूड पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक,मुरगूड पोलीस ठाणे	
१२	गांधीनगर पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक, गांधीनगर पोलीस ठाणे	
१३	एमआयडीसी शिरोली पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक, एम.आय.डी.सी.शिरोली पोलीस ठाणे	
१४	गोकुळ शिरगांव पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक,गोकुळ शिरगांव पोलीस ठाणे	
१५	ईस्पुर्ली पोलीस ठाणे	सहाय्य पोलीस निरीक्षक,ईस्पुर्ली पोलीस ठाणे	
१६	उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहुवाडी विभाग, कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहुवाडी विभाग	अपर पोलीस अधीक्षक, कोल्हापूर.
१७	शाहुवाडी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,शाहुवाडी पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी, शाहुवाडी विभाग कोल्हापूर.
१८	गगनबावडा पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,गगनबावडा पोलीस ठाणे	
१९	कोडोली पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक, कोडोली पोलीस ठाणे	
२०	राधानगरी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,राधानगरी पोलीस ठाणे	
२१	पन्हाळा पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,पन्हाळा पोलीस ठाणे	
२२	कळे पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक,कळे पोलीस ठाणे	
२३	उपविभागीय पोलीस अधिकारी,इचलकरंजी विभाग,कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, इचलकरंजी विभाग	अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज
२४	इचलकरंजी पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,इचलकरंजी पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी, इचलकरंजी विभाग कोल्हापूर.
२५	शिवाजीनगर पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,शिवाजीनगर पोलीस ठाणे	
२६	शहापूर पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,शहापूर पोलीस ठाणे	
२७	कुरूंदवाड पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,कुरूंदवाड पोलीस ठाणे	
२८	हुपरी पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक,हुपरी पोलीस ठाणे	
२९	उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर विभाग,कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर विभाग	अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज.
३०	जयसिंगपूर पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक, जयसिंगपूर पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी, जयसिंगपूर विभाग कोल्हापूर.
३१	हातकणंगले पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,हातकणंगले पोलीस ठाणे	
३२	पोलीस निरीक्षक,वडगांव पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,वडगांव पोलीस ठाणे	
३३	शिरोळ पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,शिरोळ पोलीस ठाणे	

३४	उपविभागीय पोलीस अधिकारी,गडहिंग्लज विभाग,कार्यालय	उपविभागीय पोलीस अधिकारी, गडहिंग्लज विभाग	अपर पोलीस अधीक्षक, गडहिंग्लज.
३५	गडहिंग्लज पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,गडहिंग्लज पोलीस ठाणे	उपविभागीय पोलीस अधिकारी, गडहिंग्लज विभाग कोल्हापूर.
३६	भुदरगड पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,भुदरगड पोलीस ठाणे	
३७	आजरा पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,आजरा पोलीस ठाणे	
३८	चंदगड पोलीस ठाणे	पोलीस निरीक्षक,चंदगड पोलीस ठाणे	
३९	नेसरी पोलीस ठाणे	सहाय्यक पोलीस निरीक्षक,नेसरी पोलीस ठाणे	

त्याप्रमाणे पोलीस अधीक्षक कार्यालयात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, जिल्हा विशेष शाखा, नियंत्रण कक्ष कोल्हापुर, सुरक्षा शाखा, पोलीस मुख्यालय व मोटार परिवहन विभाग असुन तेथे प्रभारी अधिकारी म्हणुन पोलीस निरीक्षक,सहा.पोलीस निरीक्षक व पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत.

पोलीस अधीक्षक कार्यालयाकडील मंत्रालयीन आस्थापनाः

१)**पत्रव्यवहार शाखा-** अधिकारी,लिपीक वर्गीय व वर्ग-४ चे कर्मचारी यांची आस्थापना,मोटार परिवहन, शस्त्र, परमिट/स्फोटक परवाना प्रकरणे,पत्रव्यवहार,विद्युत,पाणी,टेलिफोन बिले मंजुर करणे.

२)**लेखा शाखा-** वित्तीय मर्यादांचे पालन करुन अनुदान प्राप्त करुन घेणे व अनुदान खर्ची घालणे,वित्त विषयीची कार्यालयीन कामकाजा संदर्भातील सर्व प्राधणे व अधिकारी/कर्मचारी यांना अनुदेय वेतन व भत्ते संदर्भातील खर्च प्रदाणे बँके मार्फत करणे.

३)**अर्ज शाखा-** वरिष्ठा कडून/जनते कडुन प्राप्त झालेले तक्रार अर्जावरील पत्रव्यवहार.

४)**आस्थापना शाखा-** पोलीस कर्मचारी यांची आस्थापना,नेमणुका,पदोन्नती,बदल्या,इतर सर्व अभिलेख ठेवणे.व त्याबाबतची ती कार्यवाही करणे.

५)**वाचक शाखा-** जिल्हयातील गुन्हे विषयक अभिलेख ठेवणे,गुन्हे प्रतिबंध,गुन्हे तपासावर परिवेक्षण,पोलीस अधिका-यांच्या कामावर आठवडा परिवेक्षण ठेवणे व आवश्यक त्या सुचना देणे.

६)**जिल्हा विशेष शाखा-** पोलीस बंदोबस्त,जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था,जातीय,राजकीय,आर्थिक ,सामाजिक इ.घडामोडी,संप,टाळेबंदी,मोर्चे,धरणे,जातीय तंटे,चारित्र्य पडताळणी,परदेशीय नागरीकांवर देखरेख,सार्वजनिक निवडणुक बंदोबस्त,अंतर्गत सुरक्षा,अति महत्वाच्या व्यक्तीचे दौरे,बंदोबस्त/सुरक्षा इ.

७)**पोलीस कल्याण शाखा-** पोलीस कर्मचारी यांचे साठी विविध कल्याणकारी योजना राबविणे.

८)**पोलीस नियंत्रण कक्ष-** जिल्हयातील घडामोडी संदर्भात सर्व माहिती घेवुन संबंधीतानां देणे.

९)**पोलीस मुख्यालय व मोटार परिवहन-** जिल्हयातील बंदोबस्त,आरोपी पार्टी,खजीना पार्टी करीता कर्मचारी पुरविणे,शस्त्रागाराची देखरेख ठेवणे,कर्मचा-या करीता गणवेश साहित्याचा पुरवठा करणे,कार्यकारी दलातील व नवप्रविष्ठ पोलीस कर्मचा-यांचे पोलीस कवायत प्रशिक्षण सराव नियमितपणे घेणे,तसेच वार्षिक गोळीबार सराव करुन घेणे,जिल्हयातील पोलीस वाहनांची मोटार परिवहन विभागा मार्फत देखरेख ठेवणे.

१०)**शहर वाहतुक नियंत्रण शाखा,कोल्हापूर-** शहरातील वाहतुक सुरळीत व सुरक्षित ठेवणे,वाहतुकीचे नियोजन व नियंत्रण करणे,प्रचलित मोटार वाहन कायद्याची अंमलबजावणी करणे,विशेष मोहिमेचे आयोजन करणे,मोटार वाहन चालकांना मार्गदर्शनाकामी प्रबोधन करणे,सिग्नल यंत्रणा व वाहतुकीबाबतची साधन सामर्गी महानगरपालिका कार्यालयाकडुन उपलब्द करुन घेणे,आर.एस.पी.विद्यार्थी व विद्यार्थींना परेड व वाहतुकीबाबतचे प्रशिक्षण देणे.

११)**पोलीस बिनतारी संदेश विभाग-** जिल्हयातील बिनतारी संदेश दळणवळण यंत्रणा सुरळित ठेवणे.

२) **अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार**

महाराष्ट्र पोलीस नियमावली,१९९९ भाग १,२ व ३,मुंबई पोलीस अधिनियम १९९१,महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८२,सिआरपीसी १९७३,वित्तिय अधिकार १९७८,कार्यालयीन कार्य पध्दती नियम पुस्तीका, महाराष्ट्र नागरी सेवा नियम - वेतन १९८२ महाराष्ट्र नागरी सेवा सेवानिवृत्ती वेतन १९८२,आकस्मित खर्च अधिनियम १९७८ व त्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेले शासन निर्णय व परिपत्रके (भारतीय कायदे, नियमावली,फौजदारी कायदे,महाराष्ट्र नागरी सेवा १९८२) प्रमाणे खात्याचे अधिकार व कर्तव्य आहेत.सर्व अधिकारी व त्यांचे अधिपत्याखाली कर्मचारी यांना त्यांचे अधिकाराची जाणीव करुन देणेत आलेली आहे.जनतेच्या येणा-या तक्रारीचे निरसन ते स्वतः करतात.व हाताखालील कर्मचा-यांकडून करवुन घेतात.व उदभवणारे परिस्थितीनुसार कायादा व सुव्यवस्थेचा प्रश्न हाताळतात.

३) **निर्णय घेण्याचे अधिकार व जबाबदारी**

जिल्हा स्तरावर पोलीस अधीक्षक,अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय अधीक्षक व उप विभागाचे स्तरावर उप विभागीय पोलीस अधिकारी हे कायद्याचे कार्यक्षेत्रात राहुन नियमानुसार निर्णय घेतात.व आपली जबाबदारी पारदर्शकपणे पार पाडतात.तसेच आवश्यक त्या ठिकणी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेतले जाते.

४) **कामकाजाची पध्दत**

पोलीस अधीक्षक,अपर पोलीस अधीक्षक,पोलीस उपअधीक्षक मुख्यालय हे आपले कार्यालयात नियमीत हजर राहुन दैनंदिन कामकाज स्वतः व हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांचेकडून करवुन घेतात.जिल्हयातील पोलीस ठाणेकडून दाखल झालेल्या गुन्हयांची व इतर माहिती दररोज घेतात व ती पडताळणी करतात.कार्यालयात प्राप्त होणा-या तक्रार अर्जावर तक्रारदारांचे म्हणणे ऐकून तक्रारीचे निवारण करणेसाठी ज्या त्या विभागातील उपविभागीय पोलीस अधिकारी किंवा प्रभारी पोलीस अधिका-यांना आदेश देऊन तक्रारीचे निवारण करतात.जिल्हयातील घडलेल्या गुन्हयात तपासासाठी मार्गदर्शन करतात.जिल्हयात पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे,शरीराविरुध्द व मालविरुध्दच्या गुन्हयांना आळा घालणे.व आवश्यकते नुसार कायदशीर प्रतिबंधात्मक कारवाई करणे इ.कामकाज केले जाते.

५) **खात्याच्या अधिकारात येणारे नियम,परिपत्रके ,सुचना**

पोलीस अधीक्षक हे त्यांना प्राप्त असणा-या अधिकाराचे अंमलबजावणी पारदर्शकपणे पार पाडतात,वरिष्ठ कार्यालयाकडून येणारी परिपत्रके व सुचना यांचे अंमलबजावणी करणेबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस अधिकारी,तसेच कर्मचारी यांना सुचना देतात. पोलीस अधीक्षक यांचे कडुन वेळोवेळी दैनंदिन कामकाज गुन्हे तपास इ.बाबत अंमलबजावणी सुचना करणेत येतात.

६) **खात्याच्या अधिकारात येणारी कागदपत्रे**

गुन्हे,मयत,अपघात या कारणांचे तपास कागदपत्रे,दाखल होणारे वरिष्ठ व स्थानिक अर्ज चौकशीची कागदपत्रे,वरिष्ठ कार्यालयाकडुन येणारी परिपत्रके ,सुचना इ.कागदपत्रे तसेच पोलीस ठाणेकडुन/कार्यालयाकडुन करणेत येणा-या पत्रव्यवहाराच्या प्रती,पोलीस अधिकारी व कर्मचा-यांचे अभिलेखाची त्या त्या प्रमाणे वर्गवारी करुन ठेवणेत येतात.

७) सल्लामसलितीसाठी यंत्रणा व जनतेच्या मार्गदर्शनाची कार्यपध्दती

पोलीस अधीक्षक कार्यालयात कामकाजात येणा-या अडीअडचणीबाबत मार्गदर्शन करणेकरीता इकडील कार्यालयात विधी अधिकारी यांची नेमणुक करण्यात आलेली आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेसाठी शांतता कमिटी,मोहल्ला कमिटी,तंटामुक्त गांव अभियान,पोलीस मित्र योजना पोलीस ठाणे स्तरावर राबविणेत येत आहेत.काही समस्या उदभवलेस संबंधीत नेत्याची बैठक घेतली जाते.

८) जनतेसाठी खाते अंतर्गत स्थापनेत आलेल्या समित्या व त्यांच्या कार्यपध्दती

पोलीस ठाणे स्तरावर महिला दक्षता समिती,गुन्हे नियंत्रण समिती,मोहल्ला कमिटी,शांतता समिती,तंटा मुक्त समिती,ग्राम सुरक्षा दले,पोलीस मित्र इ.समित्या व कमिटी स्थापन करण्यात आलेल्या असुन त्यांचे सुचना घेवुन त्याच प्रमाणे त्यांचे कामकाजाचा आढावा घेवुन मार्गदर्शन करणेत येते.

९) खात्यातील सर्व अधिकार व कर्मचारी यांच्या नावाची सुची

खात्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे नांवाची सुची पोलीस अधीक्षक कर्यालयामध्ये उपलब्ध आहे. जिल्हयातील प्रत्येक पोलीस ठाणेकडे नेमणुकीस असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे नांवचे फलक लावणेत आलेले आहेत.

१०) खात्यातील अधिकारी व कर्मचा-यांना उपलब्द असलेली मासिक प्राप्ती/भरपाई इ.

जिल्हयामध्ये प्रत्येक पोलीस ठाणे कडील लेखनीक पोलीस हवालदार यांचे कडे/पोलीस अधीक्षक कार्यालय,कोल्हापुर.येथे अधिकारी व कर्मचा-यांना उपलब्ध असलेली मासिक प्राप्ती इ.बाबतची माहिती उपलब्ध करुन ठेवणेत आलेली आहे.

११) खात्याच्या विनियोगासाठी वेगवेगळे उपलब्द निधी,योजना खर्चाच्या तरतुदी व वापर

खात्याच्या विनियोगासाठी शासनाकडुन उपलब्ध होणा-या निधीचा विनियोग शासनाने विहित केलेलया नियमानुसार खर्च केला जातो.

१२) सबसिडी उपलब्ध असलेस ती माहिती,कार्यक्रम व लाभार्थी बाबतची माहिती

सदरची माहिती निरंक आहे.

१३) सवलती,परवाने,अधिकार याबाबत जे अधिकार आहेत ती माहिती

पोलीस अधीक्षक हे त्यांना प्राप्त असलेल्या अधिकारान्वये ते अंमलबजावणी करतात व ज्या प्रकरणी त्यांना अधिकार प्राप्त नाहीत अशी प्रकरणे ते चौकशी करुन पुढील कार्यवाहीकरीता वरिष्ठ कार्यालयाकडे अथवा महाराष्ट्र शासनाकडे सादर करतात.

१४) इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती

महाराष्ट्र पोलीस दलाची माहिती www.mahapolice.com या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.व कोल्हापूर पोलीस दलाची माहिती www.kolhapurpolice.com या संकेतस्थळावर उपलब्द करुन देणेत आलेली आहे.

१५) **नागरिकांना माहिती मिळविण्याबाबतच्या सुविधा,कार्यालयाची वेळ व लायब्ररीची माहिती**

नागरिकांनी माहिती अधिकारान्वये मागणी केलेली माहिती त्यांना मागणी प्रमाणे पुरविली जाते.त्याशिवाय समक्ष येवुन भेटणा-या नागरिकांना सुध्दा कायदेशिर बाबींची माहिती दिली जाते.

१६) **माहिती अधिका-यांची नांवे .पदनांम व अन्य माहिती**

जन माहिती अधिकारी - कार्यालय अधीक्षक,पोलीस अधीक्षक कार्यालय,कोल्हापुर.

दुरध्वनी नं.०२३१-२६६२३३

अपिलीय अधिकारी - मा. पोलीस उपअधीक्षक मुख्यालय,कोल्हापुर दुरध्वनी नं.०२३१-२६५७५९१

१७) **खात्याने निश्चित केलेल्या अन्य संबंधीची माहिती**

दारिद्र्य रेषेखालील लोकांकरीता अधिकारान्वये माहिती मोफत उपलब्ध करुन देणेत येत आहे.पोलीस ठाणे कडुन जनतेला लवकर माहिती उपलब्ध करुन देणे बाबत सर्व पोलीस ठाणे अधिकारी/कार्यालयातील सर्व अधिकारी ,कर्मचारी यांना कळविणेत आलेले आहे.

(निकेश खाटमोडे-पाटील)
पोलीस अधीक्षक,कोल्हापूर.